# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद

## शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) परीक्षा २०२५

## "प्रसिध्दी निवेदन"

महाराष्ट्र शासनाच्या पत्र क्रमांक संकीर्ण २०२५/प्र.क्र.९२/टिएनटी-१, दि.२८/०२/२०२५ व मा. आयुक्त (शिक्षण), यांचे जा.क्र. आस्था-क/प्राथ १०६/टेट-३/वेप/२०२५/११९१, दि.१९/०३/२०२५ रोजीच्या पत्रान्वये तसेच सदर परीक्षा शासन निर्णय सामान्य प्रशासन प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ, दिनांक २१ नोव्हेंबर २०२२ नुसार शासनाने नेमलेल्या IBPS या संस्थेमार्फत **"शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) परीक्षा २०२५"** चे आयोजन ऑनलाईन पध्दतीने **दिनांक २७/०५/२०२५ ते ३०/०५/२०२५ व दिनांक ०२/०६/२०२५ ते ०५/०६/२०२५** या कालावधीत राज्यातील **२६** जिल्हांमध्ये एकूण **६०** परीक्षा केंद्रांवर महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने ८ दिवसामध्ये प्रतिदिन तीन सत्रात करण्यात आले होते. सदर परीक्षेस एकूण **२२८८०८** परीक्षार्थी / उमेदवारांनी नोंदणी केली होती त्यापैकी परीक्षेस एकूण **२११३०८** प्रविष्ठ झाले होते.

सदर परीक्षेचा निकाल **दि.१८/०८/२०२५** रोजी गुणयादी व गुणपत्रक (SCORE LIST & SCORE CARD) महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या **www.mscepune.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच राखीव ठेवण्यात आलेल्या बी.एड. व डी.एल.एड. परीक्षेचे एकूण **६३२०** प्रविष्ठ (Appear) विद्यार्थी/उमेद्वारांपैकी **२७८९** विद्यार्थी/उमेद्वारांचा निकाल **दि. २५/०८/२०२५** प्रसिध्द करण्यात आला आहे. तद्नंतर **दि. ०३/०९/२०२५ रोजी ३४४** विद्यार्थी/उमेद्वारांचा निकाल प्रसिध्द करण्यात आला आहे.

राखीव ठेवण्यात आलेल्या बी.एड. व डी.एल.एड. परीक्षेचे एकूण **६३२०** प्रविष्ठ (Appear) विद्यार्थी/उमेद्वारांपैकी **एकूण ३१८७** प्रविष्ठ (Appear) विद्यार्थी/उमेदवारांनी २ मे २०२५ अन्वये महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या दिलेल्या संकेतस्थळावरील लिंकद्वारे अद्यापही माहिती न भरल्याने अशा **३१८७** विद्यार्थी/उमेदवारांचा निकाल राखीव ठेवण्यात अलेला आहे. याद्वारे पुन:श्च आवाहन करण्यात येते कि, दि १५/०९/२०२५ पर्यंत महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या **www.mscepune.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिलेल्या लिंक मध्ये माहिती व अंतिम वर्षास प्रविष्ट उत्तीर्ण असलेबाबतचा निकाल देण्यात यावा. दि १५/०९/२०२५ नंतर माहिती सादर करणाऱ्या विद्यार्थी/उमेदवारांच्या राखीव निकालाबाबत विचार केला जाणार नाही. याची सर्व विद्यार्थी/उमेदवारांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.

**ठिकाण :** पुणे

**दिनांक:** ०९ /०९/२०२५

(अनुराधा ओक)
आयुक्त
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - ०४